# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश/२०१७/ १४८२ दिनांक : १५/०४/२०१७

प्रति

प्राचार्य / संचालक

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

विषय - शैक्षणिक वर्ष २०१७-१८ राज्यात व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवित्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यतेची पत्रे सादर करणेबाबत.....

संदर्भ – मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१७/४६६ दिनांक १५/०४/२०१७.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी, एम.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या संस्थाच्या संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सोबत जोडलेल्या पत्रामधील अनु क्र १ ते १६ पैकी कशासाठी संस्थेस मान्यता दिलेली आहे याबाबत ठळक पणे संस्थेच्या मुखपत्रात नमुद करुन सदर ई मेल मान्यता पत्राच्या प्रतीसह दिनांक २०/०४/२०१७ पर्यत **desk2@dtemaharashtra.gov.in** सादर करावा. विद्यमान संस्थांनी ई-मेल सोबत **Attach File** चे नाव हे संस्थेचा डी टी ई कोड द्यावा व नवीन संस्थांनी ई-मेल सोबत **Attach File** ला संस्थेचे नाव देवून ई मेल सादर करावा.

तसेच ई-मेल व्दारे पाठविण्यात आलेल्यापत्राची प्रत **(Hard Copy)** टपालाने सुध्दा संचालनालयास पाठविण्यात यावी.

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत – प्रोग्रामर, यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक :- २/एनजीसी/मान्यता/२०१७/ ५६६

दिनांक : 15 APR 2017

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र / एच.एम.सी.टी./
एम.बी.ए. /एम.सी.ए. अभ्यासक्रमाची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता राज्यात व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवित्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यतेची पत्रे सादर करणेबाबत.........**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांचे मार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी, एम.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या संस्थाच्या संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांना **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यता पत्राची प्रत या संचालनालयास दि. २०.०४.२०१७ पर्यंत** desk2@dtemaharashtra.gov.in **उपलब्ध करून द्यावी.** सदर प्रत संस्थेच्या मुखपत्रासोबत उपलब्ध करून देतांना डीटीई कोड, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली खालील पैकी कशासाठी संस्थेस मान्यता दिलेली आहे याबाबत ठळक पणे संस्थेच्या मुखपत्रात नमूद करावे. विद्यमान संस्थांनी ईमेल सोबत Attach File चे नांव संस्थेचा डीटीई कोड द्यावे. नवीन संस्थानी ईमेल सोबत Attach File **चे नांव संस्थेचे** नांव देण्यात यावे.

१. अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र /वास्तुशास्त्र / एचएमसीटी अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालय सुरू करणे.
२. विद्यमान अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम किंवा सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ
३. विद्यमान अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी महाविद्यालयात अभ्यासक्रम बंद किंवा अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट.



12.12. website वर टाकणे 
१७/४/१७

४. आखाती देशातील ओसीआय / पीआयओ/ विदेशी / भारतीय कामगारांच्या मुलांकरीता नवीन जागा उपलब्ध करणे / पुढे चालू ठेवणे.
५. अनिवासी भारतीयांच्या मुले / मुलींकरीता नवीन जागा उपलब्ध करणे / पुढे चालू ठेवणे.
६. संस्थेची साइट / ठिकाणातील बदल.
७. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट.
८. कोर्सच्या नांवात बदल करणे
९. संस्थेच्या नावात बदल करणे
१०. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे
११. संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे
१२. नो-अॅडमिशन
१३. प्रवेश क्षमता परिषदेमार्फत थेट कमी करणे
१४. संस्था बंद करण्यास मान्यता देणे.
१५. संस्थेची मान्यता काढून घेणे
१६. मान्यतेस मुदतवाढ (EoA)

येथे असेही सुचित करण्यात येते की, ई-मेल द्वारे पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत [Hard Copy] टपालाने सुध्दा या संचालनालयास पाठविण्यात यावी.

(चंद्रशेखर ओक, भा.प्र.से.)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाना आपले स्तरावरुन कळविण्यात याव्यात.